भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२९५/माहिती कक्ष/वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा

दिनांक २८/०४/२०१७

१) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे स्वत: झाडाला धडक मारून गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावल्याने गुन्हा नोंद:—

दिनांक २७/०४/०१७ चे ०७.४५ वा. ते ०८.०० वा. दर. यातील आरोपी मृतक मो. सा. चा चालक याने रस्त्याच्या स्थितीतीकडे दुर्लक्ष करून आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवत नेवुन रोडाचे खाली डाव्या बाजुस असलेल्या झाडाला मोटर सायकलची धडक मारून स्वत: गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावल्याने फिर्यादी अरविंद झाडुजी कुंभरे वय ३० वर्ष रा. लेंडेझरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. गोबरवाही येथे कलम २७९, ३०४ (अ) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. झोटींग पो स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

२) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल ही स्लीप होवुन पडुन स्वत: चे मरणास कारणभुत होऊन,एकास जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २६.०४.२०१७ १९०० वा. दरम्यान यातील आरोपी मृतक याने आपल्या ताब्यातील मो. सा. क्र एम एच ४० आर १२३२ ही हयगयीने लापरवाहीने निष्काळजीपणे चालवुन मो. सा. ही स्लीप होवुन खाली पडुन स्वत: चे मरणास कारणीभुत होवुन व मागे बसलेला रमेश गराडे रा मांडेसर यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने मर्ग क्र ०९/१७ कलम १७४ जाफौ चे चौकशी अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोहवा दिक्षीत यांचे रिपोर्ट वरुन पो स्टे आंधळगाव येथे कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवि. सहकलम ३/१८१, १३९/१७७ मोवाका चा गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि म्हैसकार पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहे

३) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल ही खड्डयात पडुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने व एकास जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २६/०४/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी चालक हे आरोपीच्या ताब्यातील मो. सा. ने लग्नाचे रिसेप्शन करीता डब्बलसीट ग्राम मांगली येथुन दारू पिवुन एन्जॉय करून वलनी येथे रस्त्याने परत येत असतांना चालक हा दारू पिवुन असल्याने त्याचे ताब्यातील मो. सा. वरील नियंत्रण सुटल्याने गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्डयात पडल्याने यातील फिर्यादीस गुडघ्याला व डोक्याला मार लागल्याने गंभीर जखमी झाला व मो. सा. चालक आरोपी हा स्वत: चे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी दिपक देवणार भाजीपाले वय २४ वर्ष रा सावरला यांचे बयाणावरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कळंबे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

४) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणाऱ्या ईसमास धडक मारून गंभीर जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २६/०४/२०१७ चे १८.४५ वा दरम्यान यातीलयातील फिर्यादीचे वडील जखमी भुमेश्वर देविदास गिऱ्हेपुंजे वय ५० वर्ष रा. मानेगाव हो एनएच. ०६ रोड ओलांडुन घराकडे पायी जात असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटारसायकल लाखनी कडुन साकोली कडे जातांनी बेदरकारपणे, हयगयीने चालवुन फिर्यादीचे वडीलास धडक मारून त्यास गंभीर जखमी करण्यास कारणीभुते झाल्याने फिर्यादी कु. पल्लवी भुमेश्वर गिऱ्हेपुंजे वय २० वर्ष रा. मानेगाव यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो. स्टे. लाखनी हे करीत आहे.

**५) संगनमत करून बिनापास परवाना रेती चोरी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २७/०४/२०१७ चे २२.४५ वा. दरम्यान यातील आरोपी चालक मालक यांनी संगनमत करून आपले ट्रॅक्टर मध्ये अंदाजे १ ब्रॉस रेती किं. २०००/रू. ची बिना पास परवाना चोरीने रेती भरून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना बिसने यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**६) मंदीराच्या लोखंडी दाराचे कुलुप तोडुन दानपेटीचा ताला तोडुन पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २६/०४/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील नवदुर्गा मंडळ पंचशिल वार्ड साकोली येथील दुर्गा मंदीराच्या उत्तर मुखी लोखंडी दाराचे कुणीतरी अज्ञात चोराने कुलुप तोडुन मंदीराचे हॉलमध्ये प्रवेश करून हॉलमधुन दुर्गा मातेच्या खोलीचे चॅनल गेटची लोखंडी कडी तोडुन आत प्रवेश करून त्यात ठेवलेली दानपेटीचा ताला तोडुन त्यातील चिल्लर अंदाजे ५००/रू. चोरून नेल्याने फिर्यादी आदिनाथ चेतराम नंदागवळी वय ७१ वर्ष रा. पंचशील वार्ड साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.बागळे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

**७) दाराची कडी तोडुन आलमारी मधील चांदीच्या दागीने चोरून नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २६/०४/२०१७ चे २३.०० वा. ते २७/०४/२०१७ चे ०८.३० वा.दरम्यान यातील फिर्यादीचे भावजीचे व भावाचे एकच घर नेहरू वार्ड वरठी येथे असुन ते दोघेही सैन्यात असल्याने तैनातीचे ठिकाणी परिवारासह राहतात त्या घराला कुलुप लावलेले असुन कुणीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराची कडी तोडुन आत प्रवेश करून घरात ठेवलेल्या आलमारीमधील ३० चांदीच्या अंगठया, ०५ चांदीचे हाताचे कडे,०२ चांदीचे कडे, ०३ तोडे चांदीच्या पायपट्टया असा १०,२००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी निखील मधुकर कावळे वय २४ वर्ष रा. नेहरू वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहे.

**८) एटी.कार्ड चोरून बॅक खात्यातुन पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०३/२०१७ ते १५/०४/२०१७ पर्यत यातील फिर्यादीचा मुलगा राम रामेश्वर वाघाडे वय २५ वर्ष रा. सनफ्लॅग कंपनी परठी येथे सेक्युरिटी गार्ड म्हणुन नौकरी वर असुन तो खमाटा येथे पाण्याच्या टाकीवर कर्तव्यावर असतांना कोणीतरी अज्ञात चोराने त्याचा एटीएम कार्ड चोरून त्याचे बॅक ऑफ इंडीया या बॅकेत मधुन ६९,५००/रू. डेबिट करून चोरून नेल्याने फिर्यादी रामेश्वर तुकडु वाघाडे वय ५८ वर्ष रा. रूपेरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवि. सहकलम ६६(सी) आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि खंडाते पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहे.

**९) अवैध दारु अड्डयावर / जुगारावर धाडी . :–**

दिनांक २७/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. वरठी,सिहोरा,साकोली,अडयाळ येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४५ लिटर हा.भ.दारू + १६० के.जी. सडवा मोहा साहीत्य किंमती ७,९२०/–रु, तसेच जुरातुन किंमती १६३/रू. माल असा एकुण किंमती ८,०८३/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(सपोनि. श्री. हत्तीमारे सा.)
जिवीशा. कार्यालय भंडारा
दुरध्वनी.८६६८६९५६३५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.